आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२६ जून २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधान परिषदेच्या ४ जागांसाठी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सुमारे ६४ टक्के मतदान
- राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होणार, मुख्यमंत्र्यांच्या चहापानावर बहिष्कार टाकत विरोधी पक्षांचा आक्रमक पवित्रा
- लोकसभेच्या सभापतीपदी ओम बिर्ला यांची सलग दुसऱ्यांदा निवड

  **आणि**
- राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या एकशेपन्नासाव्या जयंती दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रमांद्वारे अभिवादन / वंचित बहुजन आघाडीच्या आरक्षण हक्क परिषदेत आरक्षणाची १०० टक्के अंमलबजावणी करण्याची मागणी

**<><><><><>**

विधान परिषदेच्या ४ जागांसाठी आज मतदान झालं. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मुंबई पदवीधर मतदारसंघात ५२ पूर्णांक १८ शतांश टक्के, तर मुंबई शिक्षक मतदारसंघात ७३ पूर्णांक ३६ शतांश टक्के मतदान झालं होतं.

कोकण पदवीधर मतदारसंघात ५९ पूर्णांक ३१ शतांश टक्के, तर नाशिक शिक्षक मतदारसंघात ७० टक्के पेक्षा जास्त मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

नाशिकमधे २१ उमेदवार रिंगणात असल्याने मतदारांना पसंतीक्रमानुसार मते देण्यास वेळ लागत असून अंतिम आकडेवारी उशिरा उपलब्ध होईल असं जिल्हा प्रशासनानं सांगितलं. नाशिक शहरात बी डी भालेकर मैदानात मतदारांना पैसे वाटप केल्याच्या आरोपावरून पोलिसांनी एकाला ताब्यात घेतलं. मतमोजणी १ जुलै रोजी होणार आहे.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला शासनातर्फे आज सह्याद्री अतिथीगृह येथे चहापान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, शिवाय मंत्रिमंडळ सदस्य, विधिमंडळ सदस्य, आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विधानसभेचं निवडणुकीपूर्वीचं हे शेवटचं अधिवेशन असून ते येत्या १२ जुलैपर्यंत चालेल. येत्या शुक्रवारी २८ जुलैला राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प दोन्ही सभागृहांमधे मांडला जाईल.

**<><><><><>**

विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला प्रथेनुसार मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला. महाविकास आघाडीच्या पत्रकारपरिषदेत विधानसभेतले विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी ही माहिती दिली. पावसाळी अधिवेशनात राज्यातल्या विविध प्रश्नांवर विरोधी पक्ष आवाज उठवतील असं ते म्हणाले. नैसर्गिक आपत्ती, कर्जाचा बोजा आणि विमा कंपन्याकडून फसवणुकीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमुक्ती द्यावी, वीजबिलं माफ करावी, विविध परीक्षांमधल्या पेपरफुटीविरुद्ध कठोर कायदा याच अधिवेशनात करावा, आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी जातनिहाय जनगणना करावी, शक्तीपीठ मार्ग प्रकल्प रद्द करावा या मागण्या विरोधक लावून धरतील असं वडेट्टीवार यांनी सांगितलं. राज्यात भ्रष्टाचार बोकाळला असल्याचा, तसंच कायदा आणि सुव्यवस्था ढासळली असल्याचा आरोप त्यांनी केला.

आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून या अधिवेशनात आश्वासनांचा पाऊस पडेल मात्र मतदार त्याला भुलणार नाहीत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या पत्रकार परिषदेला विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अनिल देशमुख, शेकापचे जयंत पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अजय चौधरी, आणि इतर ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ खासदार ओम बिर्ला यांची आज लोकसभेच्या सभापतीपदी सलग दुसऱ्यांदा निवड झाली. निवड झाल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेस नेता राहुल गांधी आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बिर्ला यांचं अभिनंदन केलं आणि त्यांना आसनापर्यंत नेलं.

बिर्ला यांची दुसऱ्यांदा निवड होण्यानं इतिहास रचला गेल्याची प्रतिक्रिया मोदी यांनी व्यक्त केली. बिर्ला यांच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाची विधेयकं लोकसभेत मंजूर झाल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांच्या कार्यकाळात ९७ टक्के विधायक काम झाल्याचं मोदी म्हणाले. संसद सदस्यांची वर्तणूक आणि उत्तरदायित्व यामुळे जनतेचा संसदीय लोकशाहीवरचा विश्वास वाढतो, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

तत्पूर्वी आज लोकसभेचं कामकाज सुरू होताच मोदी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या इतर नेत्यांनी बिर्ला यांची सभापतीपदी निवड करण्यासाठीचा प्रस्ताव ठेवला होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे आणि समाजवादी पक्षाचे आनंद भदौरिया यांनी काँग्रेसचे सभापतीपदासाठीचे उमेदवार कोदिकुन्निल सुरेश यांना अनुमोदन देणारा प्रस्ताव मांडला. पण विरोधी पक्ष मतदानाविषयी आग्रही न राहिल्यामुळे बिर्ला यांची निवड आवाजी मतदानानं करण्यात आली. बिर्ला यांची दुसऱ्यांदा लोकसभापती पदासाठी निवड झाल्याबद्दल

त्यांचं अभिनंदन करणारा प्रस्ताव संमत करुन लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

लोकसभेच्या सभापतीपदासाठी काँग्रेसनं उमेदवार उभा केल्याबद्दल केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज टीका केली. ते संसदेबाहेर वार्ताहरांशी बोलत होते. उपसभापतीपदासाठी सरकार चर्चेला तयार आहे मात्र त्यासाठी पूर्वअटी घालणं योग्य नाही असंही ते म्हणाले. लोकसभा सभापतीपदासाठी विरोधी पक्षांनी दबावाचं राजकारण केल्याची टीका केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंग यांनी केली. सरकारनं या मुद्द्यावर कोणतीही चर्चा केली नाही, असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं.

<><><><><>

'दरड प्रवण क्षेत्र मुक्त' मुंबई करण्याचा राज्य सरकारचा संकल्प असून त्याची सुरुवात झाली आहे, असं मुख्यमंत्री शिंदे यांनी आज सांगितलं. त्यांनी मुंबईत असल्फा इथल्या हनुमान टेकडी परिसरात भेट देऊन तिथं सुरु असलेल्या कामाची पाहणी केली. त्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते. दरड प्रवण क्षेत्राला सुरक्षा जाळ्या बसवून पावसाळ्यात दरडी कोसळून होणारं नुकसान टाळलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

म्हाडा, महानगरपालिका, एमआयडीसी यांच्यासह इतर शासकीय यंत्रणांच्या सहकार्यानं, धोकादायक इमारतींबाबत धोरण ठरवणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

धोकादायक ठिकाणच्या नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे. धोकादायक इमारती, एसआरए, झोपडपट्टी पुनर्वसनाची जी कामं रखडली आहेत, ती सरकारच्या विविध यंत्रणा ताब्यात घेतील आणि मुंबईकरांना हक्काचं घर मिळेल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या एकशेपन्नासाव्या जयंती दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात येत आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवन इथं  शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार  यांनीही  शाहू महाराज यांना समाजमाध्यमांवर आदरांजली वाहिली आहे. कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी शाहू महाराजांचे जन्मस्थळ असणाऱ्या लक्ष्मी विलास पॅलेस' इथल्या शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. ऐतिहासिक दसरा चौक इथं १९२७ साली बांधलेल्या शाहू महाराजांच्या पुतळ्याचं  पूजन करुन पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केलं.

शाहू महाराज यांचा जन्मदिवस ‘सामाजिक न्याय दिन’ म्हणून साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त कोल्हापूरमध्ये शोभा यात्रा आणि समता दिंडीचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

छत्रपती शाहू महाराजांच्या १५० व्या जयंती निमित्त वंचित बहुजन आघाडीनं राज्यभरात जिल्हास्तरावर विविध कार्यक्रम आयोजित केले. या कार्यक्रमातून पक्षानं दिलेले ११ ठराव मांडण्याचे आणि त्या ठरावाचे बॅनर शहरातल्या मुख्य चौकात लावण्याचे निर्देश पक्षानं दिले आहेत. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी आरक्षणाची प्रामाणिक आणि प्रभावीपणे १०० टक्के अंमलबजावणी करावी, असा ठराव वंचित बहुजन आघाडी आयोजित आरक्षण हक्क परिषदेत करण्यात आला. "खाजगीकरणात आरक्षणाची" तरतूद करावी यासाठी लढा उभारण्याचा ठरावही या परिषदेनं केला.

**<><><><><>**

मध्य गुजरात ते पूर्व विदर्भादरम्यान तयार झालेल्या कमी दाबाचा पट्ट्यामुळे काल कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. कोकणात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी तर तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पावसाची तर तुरळक ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता आहे. मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी, तर विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><><>**